**मुंबईचे नूतनीकरण: २०२४ मध्ये एमएमआरच्या भविष्याची पुनर्रचना**

**मुंबई महानगर क्षेत्रात परिवर्तन घडवून आणणारे एमएमआरडीएचे दूरदर्शी प्रकल्प**

मुंबई, ३१ डिसेंबर, २०२४:

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली आणि उपमुख्यमंत्री आणि एमएमआरडीएचे अध्यक्ष एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) २०२४ मध्ये लक्षणीय प्रगती केली असून मुंबई महानगर प्रदेशाला (एमएमआर) जागतिक आर्थिक केंद्र म्हणून स्थापित करण्याच्या उद्देशाने परिवर्तनशील पायाभूत सुविधा प्रकल्पांची पायाभरणी केली आहे. काळजीपूर्वक नियोजन आणि धोरणात्मक अंमलबजावणीद्वारे, एमएमआरडीएने मेट्रो मार्गिका, ऐतिहासिक पूल आणि इतर महत्त्वपूर्ण पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या विकासाला गती दिली आहे आणि कार्यक्षम, शाश्वत आणि भविष्यातील शहरी विकासासाठी आपल्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला आहे.

यावर्षी पूर्ण झालेले प्रमुख प्रकल्प आणि सध्या सुरू असलेले उपक्रम शहरी आव्हानांचा सामना करण्याचा, दळणवळण वाढवण्याचा आणि १ ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था होण्याच्या महाराष्ट्राच्या महत्त्वाकांक्षी उद्दिष्टात योगदान देण्याचा एमएमआरडीएचा निर्धार प्रतिबिंबित करतात.

1. **शाश्वत मेट्रो प्रकल्प-**

मुंबई मेट्रो प्रकल्पांची रचना शाश्वतता आणि पर्यावरणीय अनुकूलतेवर जोरदार भर देऊन, पुनरुत्पादक ब्रेकिंग सिस्टमसारख्या प्रगत तंत्रज्ञानाचा समावेश करून केली गेली आहे, जे ब्रेकिंग दरम्यान गतिज उर्जेचे विद्युत उर्जेमध्ये रूपांतर करून ऊर्जा वाचवतात. मेट्रो सार्वजनिक वाहतुकीच्या वापरास प्रोत्साहन देऊन शहराचा कार्बन फूटप्रिंट लक्षणीयरीत्या कमी करते, ज्यामुळे वाहनांचे उत्सर्जन आणि रस्त्यांवरील गर्दी कमी होते. याव्यतिरिक्त, प्री-कास्ट विभागांचा वापर आणि मेट्रो स्थानकांसाठी हरित इमारत प्रमाणपत्रांसह पर्यावरण-जागरूक बांधकाम पद्धती, विकासादरम्यान किमान पर्यावरणीय परिणाम सुनिश्चित करतात.

सन २०२४ मध्ये एमएमआरडीएने मेट्रो मार्गांचा विस्तार केला आहे, त्यामुळे नाकरिकांना एमएमआरमध्ये कोणत्याही भागात प्रवास करता येणार आहे.  मेट्रो मार्ग केवळ कनेक्टिव्हिटी सुधारत नाहीत तर पर्यावरणीयदृष्ट्या टिकाऊ आणि कार्यक्षम वाहतूक पद्धतीला प्रोत्साहन देतात. अंमलबजावणी सुरू असलेल्या मेट्रो प्रकल्पांचा तपशील खाली दिला आहेः

***मेट्रो मार्ग २B (डीएन नगर ते मंडाळे ) – २३.६ किमी लांबी - १९ स्थानके***

हा मेट्रो मार्ग पूर्णपणे उन्नत प्रकारचा असून त्याचे ७८% टक्के स्थापत्य काम पूर्ण झाले असून या मार्गिकेला आवश्यक असणाऱ्या मंडाळे डेपोचे ९७% टक्के स्थापत्य काम पूर्ण झाले आहे.

***मेट्रो मार्ग ४ (वडाळा-कासारवडवली) – ३२. ३ किमी लांबी - ३० स्थानके***

***मेट्रो मार्ग ४A (कासारवडवली ते गायमुख) – २.७ किमी लांबी - २ स्थानके***

मेट्रो मार्ग ४ या उन्नत मेट्रो मार्गासाठी ७५% तसेच मेट्रो मार्ग ४A या मार्गासाठी ८६% स्थापत्य काम पूर्ण झाले आहे. मार्गिकेला आवश्यक असणाऱ्या मोघरपाडा डेपोच्या भूसंपादनाचे काम प्रगतीपथावर आहे.

***मेट्रो मार्ग ५ (ठाणे - भिवंडी - कल्याण) - २४.९ किमी लांबी - १४ स्थानके***

या मेट्रो मार्गाचा पहिला टप्पा ठाणे ते भिवंडीदरम्यान असून हा ११.९ किमीचा उन्नत मार्ग आहे. या मार्गावर ६ स्थानके आहेत. मेट्रो मार्ग ५ च्या पहिल्या टप्प्याचे काम पुर्णत्वाच्या दिशेने वेगाने सरकत असून या मार्गाचे जवळपास ९४% स्थापत्य काम झाले आहे. मार्गिकेला आवश्यक असणाऱ्या कशेळी डेपोच्या जमीनीचे अंशत: अधिग्रहण झाले असून उर्वरीत भूसंपादनाचे काम प्रगतीपथावर आहे.

***मेट्रो मार्ग ६ (स्वामी समर्थ नगर ते विक्रोळी) — १४.५ किमी लांबी - १३ स्थानके***

या मार्गाचे ७७% स्थापत्य काम पूर्ण झाले आहे. मार्गिकेला आवश्यक असणाऱ्या कांजूरमार्ग डेपोच्या जमीनीचे अंशत: अधिग्रहण झाले असून उर्वरीत भूसंपादनाचे काम प्रगतीपथावर आहे.

***मेट्रो मार्ग ९ आणि ७ A (दहिसर पूर्व - मीरा भाईंदर आणि अंधेरी पूर्व ते छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ) — १३.५ किमी लांबी - १० स्थानके***

मेट्रो मार्ग ९ चे ९२% स्थापत्य काम पूर्ण झाले असून मेट्रो मार्ग ७ A चे ४६% स्थापत्य काम पूर्ण झाले आहे. मार्गावरील ०.९२४ किमीचा उन्नत स्वरुपाचा असून अंधेरी पूर्व ते छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळादरम्यानचा २.५ किमीचा भाग भूमिगत दुहेरी-बोगदा प्रणालीने जोडणारा आहे. दहिसर पूर्व ते मीरा भाईंदरला जोडणारी मेट्रो मार्ग ९ हा, मेट्रो मार्ग ७ चा उत्तरेकडील विस्तारीत भाग म्हणून ओळखला जातो. मार्गिकेला आवश्यक असणाऱ्या डोंगरी डेपोच्या जमीनीचे अंशत: अधिग्रहण झाले असून उर्वरीत भूसंपादनाचे काम प्रगतीपथावर आहे.

***मेट्रो मार्ग 12 (कल्याण ते तळोजा) - २३.७ किमी लांबी - १९ स्थानके***

या उन्नत मार्गाचा शुभारंभ झाल्यावर लगेचच पायलिंग च्या कामाला सुरुवात झाली. ही मेट्रो मार्गिका मुंबई महानगर प्रदेशातील दक्षिण मुंबई, ठाणे आणि नवीमुंबई, विरार, मीरा-भाईंदर शहराना जोडून एक नवी आणि पर्यावरणपूरक अशी वाहतूक प्रणाली उदयास येणार आहे. अशा प्रकारे, या मेट्रो मार्गांच्या एकत्रित प्रगतीमुळे महामुंबई मेट्रोचे जाळे अधिक विस्तारणार असून त्याचा लाखो प्रवाशांना फायदा होईल. या मेट्रो प्रकल्पांमुळे येणाऱ्या वर्षात एमएमआर क्षेत्रातील वाहतूक पायाभूत सुविधा अधिक बळकट होईल. या मेट्रो मार्गाचे ४% स्थापत्य काम पूर्ण झाले आहे. मार्गिकेला आवश्यक असणाऱ्या निळजे डेपोच्या जमीनीचे अंशत: अधिग्रहण झाले असून उर्वरीत भूसंपादनाचे काम प्रगतीपथावर आहे.

***मेट्रो मार्ग १० (गायमुख-शिवाजी चौक(मीरा रोड)) — ९.२ किमी लांबी - ४ स्थानके***

गायमुख ते फांउटन हॉटेल रस्त्याची रुंदी ६० मीटर झाल्यावर मेट्रोच्या कामाला सुरूवात करण्यात येईल. मार्गिकेला आवश्यक असणाऱ्या मोघरपाडा डेपोच्या भूसंपादनाचे काम प्रगतीपथावर आहे.

***शून्य आयकॉनिक ब्रिज***

वांद्रे-कुर्ला संकुल येथे (वाकोला नाला) 'शून्य' या संकल्पनेचे महत्व अधोरेखित करणारा व स्थापत्य कामांतील वास्तुकलेचा एक उत्कृष्ट नमुना ठरेल असा आयकॉनिक केबल स्टेड पूल उभारणे प्रस्तावित आहे. मेट्रो मार्ग २B प्रकल्पांतर्गत मेट्रो मार्गिका वांद्रे-कुर्ला संकुलातील वाकोला नाला ओलांडते त्या ठिकाणी मेट्रो व्हायाडक्टसाठी सदर **'शून्य आयकॉनिक ब्रिज' या केबल-स्टेड** पुलाचे बांधकाम सूरू आहे. या पुलाची एकूण लांबी १३० मीटर असून ८० मीटर लांबीचा मुख्य स्पॅन व ५० मीटर लांबीचा बॅक स्पॅन प्रस्तावित आहे. उपरोक्त दोन्ही स्पॅन शून्य आकाराच्या पायलॉनवर आधारलेले आहेत. सदर शून्य पायलॉनची उंची ३९.४६ मीटर व यासाठी वापरण्यात येणाऱ्या स्ट्रक्चरल स्टीलचे वजन सुमारे ७०० टन आहे. एचडीपीई कोटेड स्टील स्पायरल स्ट्रँड केबल्स (स्टे केबल्स) पुलास आधार देण्याचे काम करतील. सद्यस्थितीस सदर पुलाच्या पिअर क्र. ४७८ च्या पायाचे बांधकाम पूर्ण झाले असून दिनांक ०२ ऑक्टोबर २०२४ रोजी पायलॉनच्या २ सेगमेंट उभारणीचे काम यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आले आहे. सद्यस्थितीत या प्रकल्पाचे ५०% स्थापत्य काम पूर्ण झाले आहे.

**२) मुंबई इन मिनिट संकल्पना** मुंबई शहराच्या कोणत्याही ठिकाणाहून एका तासापेक्षा कमी कालावधीत इतर कोणत्याही ठिकाणी प्रवास सुलभ करण्यावर केंद्रित आहे. विद्यमान सुविधांसह नवीन आणि आगामी प्रकल्प एकत्रितपणे ही संकल्पना साकार करतील. बीएमसी, एमएसआरडीसी आणि एमएमआरडीए हे एकत्रितपणे प्रकल्प विकसित करणार आहेत. सध्याच्या सुविधांव्यतिरिक्त, एमएसआरडीसीद्वारे वर्सोवा-वांद्रे सागरी मार्ग आणि विरार-अलिबाग मल्टीमॉडल कॉरिडॉर बांधले जात असून वर्सोवा-दहिसर लिंक रोड, दहिसर-भायंदर लिंक रोड आणि गोरेगाव-मुलुंड लिंक रोड हे प्रकल्प बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे बांधले जात आहेत. तर ऑरेंज गेट टनल, शिवडी वरळी कनेक्टर, ठाणे-बोरिवली टनल, गायमुख-भाईंदर टनल आणि उन्नत मार्ग, ठाणे कोस्टल रोड, ठाणे खाडीवर ठाणे ते भिवंडीला जोडणारे तीन खाडी पूल, आनंदनगर-साकेत उन्नत रोड आणि घाटकोपर ते आनंदनगर, ठाणेपर्यंत पूर्व मूक्त मार्गाचा विस्तार यासारखे प्रकल्प एमएमआरडीएतर्फे राबविले जात आहे. यामुळे मुंबई आणि ठाणे येथे रिंग रुट तयार होत आहेत.

***बीकेसी कनेक्टिव्हिटीसाठी सिग्नल-फ्री रस्ता***

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (MMRDA) बीकेसीमध्ये वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी एक महत्त्वाचा टप्पा गाठला असून सेबी बिल्डिंगपासून अ‍ॅव्हेन्यू-5 पर्यंत, बीकेसी कनेक्टर आणि अ‍ॅव्हेन्यू-3 (वीवर्क) मार्गे जोडणाऱ्या 180 मीटर सिग्नल-फ्री रस्ता वाहतूकीसाठी खुला करण्यात आला आहे. अवघ्या 3.5 महिन्यांत, म्हणजेच निश्चित वेळेपेक्षा निम्म्या कालावधीत पूर्ण झालेला हा रस्ता बीकेसी वन जंक्शन आणि बीकेसी कनेक्टर जंक्शनवरील वाहतूक कोंडी कमी करण्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहे. या नव्या रस्त्यामुळे ईस्टर्न एक्सप्रेस वेहून बीकेसीमध्ये येणाऱ्या प्रवाशांना तीन पर्यायी मार्ग उपलब्ध झाले आहेत. यामुळे वाहतूक कोंडी लक्षणीयरीत्या कमी होणार असून वाहतुकीचा वेग आणि प्रवासाचा अनुभव सुधारला जाणार आहे. ईस्टर्न सबर्ब्जमधून बीकेसीपर्यंत आता अवघ्या 15 मिनिटांत पोहोचता येईल. सहा लेनपैकी तीन लेन वाहतुकीसाठी सुरू करण्यात आल्या असून उर्वरित तीन लेन लवकरच सुरू केल्या जातील. वाहतूक कोंडी दूर करण्याच्या आणि नागरी गतिशीलता सुधारण्याच्या दिशेने एमएमआरडीएने उचललेले हे पाऊल अत्यंत महत्त्वाचे ठरले आहे.

***अटलबिहारी वाजपेयी शिवडी न्हावा-शेवा अटल सेतू***

हा अटल सेतू २१.८ किमी लांबीचा ६ लेन असलेला भारतातील सर्वाधिक लांबीचा सागरी सेतू असून शिवडी, दक्षिण मुंबई ते न्हावा-शेवा, नवी मुंबई, रायगड पर्यंत लाखो लोकांना जोडणारा दुवा आहे. या सेतूवरून दररोज ७० हजाराहून अधिक वाहनांची ये-जा अपेक्षित असून नागरीकांचा प्रवासी वेळ १:३० तासांवरून २३ मिनिटांपर्यंत कमी झाला आहे. मुंबई ट्रान्स हार्बर लिंक म्हणून विकसित झाल्याने मुंबई बंदर आणि जवाहरलाल नेहरू बंदर दरम्यानचा दुवा ठरला आहे. सदर पुलाची पर्यावरणास अनुकुल रचना असून ऑर्थोट्रोपिक स्टील डेक तंत्रज्ञानामुळे फ्लेमिंगो पक्ष्यांच्या उड्डाण मार्गाचे संरक्षण करण्यास मदत होत आहे. अटल सेतूवरून दि. ३०/१२/२०२४ रोजीपर्यंत ७९,८०,५५३ इतक्या वाहनांनी प्रवास केला आहे.

***<u>ऑरेंज गेट टनल</u>***

मानखुर्द ते चेंबूर जंक्शन आणि पी'डिमेलो रोडवरील ऑरेंज गेट यांना जोडणाऱ्या ईस्टर्न फ्रीवेमुळे दक्षिण मुंबईच्या वाहतुकीत लक्षणीय सुधारणा झाली आहे. ऑरेंज गेट टनलद्वारे दोन भूमिगत बोगद्यांचे काम ऑरेंज द्वार ते मरीन ड्राईव्ह पर्यत करण्याचे प्रस्तावित आहे. हा प्रकल्प मुंबईतील अतिशय गर्दीच्या व शहरी भागाखालून पूर्व मुक्तमार्ग ते सागरी किनारा मार्ग याद्वारे पूर्व-पश्चिम किनारपट्टीची दक्षिण मुंबईशी अतिरीक्त सिग्नल विरहीत जोडणी असलेला व वेगवान सुरळीत वाहतूक व्यवस्था उपलब्ध करुन देणारा अत्यंत महत्वाचा दुवा ठरणार आहे. त्यामुळे पूर्व मुक्त मार्गापासून तांत्रिक दृष्टया आव्हानात्मक प्रकल्प असून या प्रकल्पामुळे प्रवासाचा वेळ १५-२० मिनिटांनी कमी होण्यास मदत होईल व इंधनाची बचत तसेच ध्वनी आणि वायू प्रदूषण कमी होईल.

***<u>सांताक्रुझ-चेम्बूर लिंकरोड (SCLR) विस्तार</u>***

हा प्रकल्प मुंबई शहरी पायाभूत सुविधा प्रकल्प (MUIP) अंतर्गत नियोजित केलेला असून बीकेसीतील महत्त्वपूर्ण व्यापारी केंद्राच्या मध्यवर्ती वाहतूक प्रवाहाला समर्थन देण्यासाठी पूर्व-पश्चिम कनेक्टिवीटी प्रदान करेल. सांताक्रुझ-चेम्बूर लिंकरोड (SCLR) हा बीकेसी ला पूर्व द्रुतगती महामार्ग आणि पश्चिम द्रुतगती महामार्गाशी जोडणारा एक उड्डाणपूल आहे. या उड्डाणपुलाची एकूण लांबी ५.४०किमी (४-लेन: २.६५ किमी, २-लेन: ३.७५ किमी) असून सांताक्रुझ-चेम्बूर लिंकरोडवर, अ) कुर्ला ते वकोला उड्डाणपूल रचना आणि बांधकाम यामध्ये वकोला चौक, युनिव्हर्सिटी चौक आणि बीकेसी चौक यांचा समाविष्ट आहे आणि ब) महानगर टेलिफोन निगम लिमिटेड चौक, बीकेसी ते एलबीएस उड्डाणपूल कुर्लापर्यंत असेल. पश्चिम द्रुतगती महामार्गापासून एलबीएसपर्यंत सांताक्रुझ-चेम्बूर लिंकरोड (SCLR) चे विस्तार होईल, ज्यामुळे नवीमुंबई कडे कनेक्टिव्हिटी निर्माण होईल आणि बीकेसी ते एलबीएस/पूर्व द्रुतगती महामार्ग आणि पश्चिम द्रुतगती महामार्गापर्यंत सुगम वाहतूक मार्ग निर्माण होईल. मुं.म.प्र.वि.प्राधिकरण एक तार (Cable-stay) पूल बांधकाम देखील करीत आहे, जो SCLR प्रकल्पाच्या विस्ताराचा एक भाग आहे, ज्यामुळे वकोला नाल्यापासून पंबाई आंतरराष्ट्रीय शाळेपासून ते पश्चिम द्रुतगती महामार्गपर्यंत कनेक्टिव्हिटी निर्माण होईल. सदर प्रकल्पाचे सुमारे ९५% स्थापत्य काम पूर्ण झाले असून उर्वरित कामकाज प्रगतीपथावर आहे.

*<u>एरोली कटाई नाका प्रकल्प</u>*

हा प्रकल्प हे ठाणे आणि नवी मुंबईसाठी एक महत्वाचा विकास प्रकल्प असून स्थानिक आणि राष्ट्रीय अर्थव्यवस्थेसाठी महत्वाचा ठरला आहे. एरोली कटाई नाका प्रकल्प ठाणे जिल्ह्यातील एक महत्त्वपूर्ण ट्रान्सपोर्ट हब आणि औद्योगिक क्षेत्र आहे. एरोली कटाई नाका प्रकल्पाच्या स्थापनेचा मुख्य उद्देश आहे - मुंबई, ठाणे आणि नवी मुंबई या महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये वाहन आणि माल वाहतुकीला सुलभ करणे,तसेच स्थानिक आणि राष्ट्रीय स्तरावर कनेक्टिव्हिटी सुधारणे. हा प्रकल्प विविध कारणांमुळे महत्त्वाचा ठरला आहे आणि त्याने आर्थिक, पर्यावरणीय तसेच औद्योगिक क्षेत्रात मोठे बदल घडवले

आहेत. ऐरोली - कटाई नाका रस्ता प्रकल्प हा ऐरोली पुलापासून सुरु होऊन ठाणे - बेलापूर रस्ता, ठाणे -बेलापूर रेल्वे, राष्ट्रीय महामार्ग क्र. ४, दिवा - पनवेल रेल्वे, इ. ओलांडून कल्याण शिळ रस्त्यावरील कटाई नाका येथे पर्यंत असून त्यांची एकूण लांबी १२.३ किमी इतकी आहे. सदर प्रकल्पामुळे कल्याण – डोंबिवली आणि नवी मुंबई मधील अंतर ७ कि.मी. ने कमी होईल त्यामुळे १५ मिनिटांच्या वेळेत बचत होईल. सदर प्रकल्प कामकाजाच्या दृष्टीने खालील ३ भागांमध्ये विभागणी केलेली आहे.
१) भाग १ :-ठाणे बेलापूर रस्ता ते राष्ट्रीय महामार्गक्र. ४ - ३.४३ कि.मी. (उन्नत मार्गाचे काम १००% पूर्ण झाले असून बोगद्याचे काम ९०% पूर्ण झाले आहे. )

२) भाग २ :-ऐरोली पूल ते ठाणे बेलापूर रस्ता - २.५७ कि.मी. (उन्नत मार्गाचे काम ७५% पूर्ण झाले आहे.)

३) भाग ३ :-राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ ते कटाई नाका जंक्शन- ६.७१कि.मी. (सदर प्रकल्पासाठी अंदाजे ३०% हेक्टर इतक्या जमिनीच्या भूसंपादनाची प्रक्रीया ही ठाणे महानगर पालिकेतर्फे पूर्ण करुन प्राधिकरणास जागा उपलब्ध करुन दिल्यानंतर प्रकल्पाची कामे हाती घेण्यात येतील)

***पुर्व द्रुतगती महामार्गावरील छेडा नगर जंक्शन, घाटकोपर (पूर्व) येथे वाहतुक सुधारणा प्रकल्प***

मुंबईच्या काही भागातून ठाण्याकडे जाणारी वाहतूक जलद होण्याच्या दृष्टीने छेडा नगर जंक्शन येथे इस्टर्न एक्सप्रेस हायवे वर विना थांबा प्रवास होण्यासाठी उड्डाणपूल/भुयारी मार्गाचा प्रकल्पामध्ये समावेश आहे. यामुळे प्रवासाच्या वेळेत २५-३० मिनिटांची बचत होत आहे. अस्तित्वातील उड्डाणपुलाशेजारी सायन ते ठाणे या मार्गाच्या दिशेने उड्डाणपूल, मानखुर्द ते ठाणे दिशेकडे उड्डाणपूल, छेडानगर ते एस.सी.एल.आर ला जोडणारा उन्नत मार्ग वाहतूकीसाठी खूले करण्यात आले आहेत. पूर्व द्रुतगती महामार्गावर कामराज नगर येथे भुयारी मार्गाचे ९६% काम पूर्ण झाले आहे. सदर मार्ग लवकरच वाहतूकीसाठी खुला करण्याच्या दृष्टीने उर्वरित कामकाज प्रगतीपथावर आहे.

***ठाणे-बोरीवली दूहेरी भुयारी मार्ग***

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानांतर्गत ठाणे आणि बोरिवली दरम्यान प्रस्तावित ११.८ कि.मी. लांबीचा दुहेरी बोगदा हा भारतातील शहरी भागांतर्गत सर्वात लांब बोगद्यांपैकी एक असेल. मूळ बोगद्याची एकूण लांबी 10.25 किमी असेल. हा ठाण्याच्या बाजूने सुरू होऊन बोरीवली येथे NH८ वर संपतो. ठाणे-बोरीवली या थेट जोडणीमुळे घोडबंदर रोडवरील वाहतूक कोंडी कमी होईल तसेच वायू आणि ध्वनी प्रदूषण कमी होण्यास मदत होऊन संबंधित क्षेत्राच्या वाढीस चालना मिळेल. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचे पर्यावरण घटकांचे संरक्षण करण्यासाठी सर्वोत्तम तंत्रज्ञानाचा वापर करुन या प्रकल्पाचे बांधकाम करणे प्रयोजित आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर बोरिवली ते ठाणे अंतर 12 मिनिटांत पूर्ण पार करणे शक्य होईल. तसेच, सुमारे 1 लाख नागरिकांचा प्रवास त्रासमुक्त होईल. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर सुमारे 1,50,000 मेट्रिक टन प्रति वर्ष कार्बन उत्सर्जनात घट होऊन सुमारे 1,00,000 PCUs (Passenger Car Units) या भूमिगत बोगद्याचा वापर करतील. सदर प्रकल्पातील बोगद्याचा भाग हा संरक्षित वन क्षेत्रातुन जात असल्याने अत्याधुनिक टनेल बोरिंग मशीन्स (Tunnel Boring Machine) च्या सहाय्याने बोगद्याचे खोदकाम करण्यात येणार आहे.

***उत्तन –विरार सागरी सेतू प्रकल्प***

मुंबईतील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी वर्सोवा ते विरार ५५.०० कि.मी. लांबी चा मुख्य सागरी सेतू बांधणे प्रस्तावित आहे. या सागरी सेतूचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर नरिमन पॉईंट वरून थेट विरार ला वेगात पोहचता येणार असून वर्सोवा ते विरार हे अंतर केवळ ४५ मिनिटांत पार करता येणार आहे. उत्तर दक्षिण कनेक्टिव्हिटी सुधारण्यासाठी आणि पर्यायी

जलद मार्ग तयार करण्यासाठी सदर प्रकल्प हा अत्यंत महत्वाचा आहे. वरील प्रकल्पाचा विरार कनेक्टर भाग दिल्ली मुंबई एक्सप्रेसवेशी जोडला जाणार आहे.उत्तन -विरार(टप्पा-१)लांबी सुमारे ५५ कि.मी. असून सागरी मार्गाची लांबी २४ कि मी असेल. सागरी मार्गाची एका बाजू कडील रुंदी अंदाजे १९.५ मी. (४+ १ आपत्कालीन मार्गिका) असून जोड रस्त्यांची एका बाजूकडील रुंदी अंदाजे १५.५ मी. (३ + १ आपत्कालीन मार्गिका) आहे. या सागरी सेतूचा वापर अधिकाधिक प्रवाशांना करता यावा यासाठी विरार, उत्तन, आणि वसई असे हे तीन कनेक्टर/ जोड रस्ते आहेत. या कनेक्टरमुळे वाहन चालकांना तीन ठिकाणांहून सागरी सेतू वर ये-जा करता येईल. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर मुंबई आणि मीरा-भाईंदर तसेच वसई-विरार मधील वाहतूक कोंडी दूर होण्यास मदत तर होईल. तसेच दक्षिण मुंबईहून अहमदाबाद महामार्गावर पोहचणे शक्य होईल. या प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) महाराष्ट्र शासनाकडे मंजूरीसाठी सादर करण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे.

***<u>शिवडी-वरळी उन्नत मार्ग</u>***

मुंबई महानगर विकास प्राधिकरणाने अटल सेतू वरुन येणाऱ्या वाहतुकीच्या प्रसार प्रणालीचा एक भाग म्हणून शिवडी वरळी हा चार पदरी उन्नत मार्ग दुवा प्रधान करेल. या प्रकल्पाची एकूण लांबी ४.५ कि.मी. असून हा उन्नत मार्ग शिवडी येथून सुरवात होऊन वरळी येथील नारायण हर्डीकर मार्गावर समाप्त होतो. अटल सेतूला वांद्रे वरळी सागरी मार्ग आणि मुंबईच्या पश्चिम किनाऱ्यावरील किनारी रस्ता प्रकल्पाशी थेट जोडला जाईल. अटल सेतू आणि वांद्रे वरळी सागरी मार्ग जोडले जातील. हा उन्नत मार्ग पूर्णपणे सिग्नल फ्रि प्रवास असून नवी मुंबई आणि दक्षिण मुंबईला जाणाऱ्या-येणाऱ्या प्रवाशांच्या वेळेची बचत होऊन त्यांना त्रासमुक्त प्रवास प्रधान करेल. पश्चिम उपनगरातील प्रवासी गोवा आणि दक्षिण भारताकडे जाण्याकरीता सायन पनवेल महामार्ग न वापरता वांद्रे वरळी सागरी मार्ग - शिवडी वरळी उन्नत मार्ग आणि अटल सेतू याचा वापर करतील. शिवडी वरळी उन्नत मार्ग हा अटल सेतू करीता एकुण १५% वाहतूकीचे योगदान देईल. दररोज सुमारे ३५००० ते ४५००० वाहन धारकांना हा प्रकल्प पूर्ण झाल्यावर फायदा होईल. वेळ आणि इंधन ह्या मध्ये लक्षणीय बचत होऊन नागरिकांचा एकूण प्रवास सुखकर होईल. सद्यस्थितीत या प्रकल्पाचे जवळपास ६०% स्थापत्य काम झाले आहे.

***<u>पॉड टॅक्सी</u>***

वांद्रे-कुर्ला संकुला मध्ये स्वयंचलित जलद सार्वजनिक वाहतूक परिवहन प्रणाली (Automated Rapid Transit System)/खाजगी जलद परिवहन प्रणाली(Personalised Rapid Transit System) प्रकल्पाची सार्वजनिक-खाजगी-भागिदारी (PPP) तत्वावर प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. वांद्रे कुर्ला संकुलातील प्रवाश्यांना अंतिम गंत व्यस्थानाकांपर्यंत Last Mile Connectivity जोडणी मजबूत करण्यासाठी पॉडटॅक्सीची संकल्पना राबविण्यात येणार आहे. पूर्णपणे वातानुकूलितपॉड १.७ मीटर रुंदनॉन-मेकॅनिकल मार्गदर्शक मार्गावर (Dedicated guideway) धावणार असून ह्या प्रणालीतील स्थानके हे २०० मीटर अंतरावर प्रस्तावित आहेत, ज्यामुळे लोकांना त्यांच्या कार्यालयातून किमान अंतर चालणे शक्य होईल. सदर प्रणालीतील पॉड्सकार हे बॅटरीवर चालतील आणि कंट्रोल सेंटर मधून नियंत्रित केले जाईल. सदर प्रकल्पाकरीता सार्वजनिक-खाजगी-भागिदारी (PPP) तत्वावर सवलतदाराची नियुक्ती केली आहे.

***<u>मुंबई महानगर प्रदेशातील मेट्रोसह असलेला पहिला डबल-डेकर उड्डाणपूल वाहतुकीसाठी खुला</u>***

मुंबई महानगर प्रदेशातील पहिल्या डबल-डेकर उड्डाणपुलाचे उद्घाटन करण्यात आले असून या अत्याधुनिक पायाभूत सुविधेत मेट्रो मार्ग-9 साठी डबल-डेकर मेट्रो व्हायाडक्ट आणि उड्डाणपूल यांचा समावेश आहे. मुंबई महानगर प्रदेशातील

हा पहिलाच डबलडेकर उड्डाणपूल असून  मेट्रो आणि रस्ते वाहतुकीसाठी स्वतंत्र स्तर आहेत. हा उड्डाणपूल सुमारे 1 किमी लांबीचा असून सध्याच्या रस्त्यापासून 5.5 मीटर उंचीवर असलेल्या या पुलामुळे वाहतूक व्यवस्था अधिक सुरळीत झाली असून मीरा रोड येथील प्लेझंट पार्क, हटकेश आणि सिल्व्हर पार्क जंक्शनवर होणाऱ्या वाहतूक कोंडीपासून प्रवाशांची सुटका झाली आहे.

३. ***MMRDA ने मुंबई महानगर क्षेत्र (MMR) ला जागतिक आर्थिक केंद्र म्हणून स्थान मिळविण्याचे कार्य हाती घेतले***

निती आयोगाच्या 'विकास केंद्र' (G-HUB) संकल्पनेनुसार, MMRDA ला मुंबई महानगर क्षेत्राच्या आर्थिक मास्टर प्लॅनची अंमलबजावणी करण्याचे काम सोपले गेले आहे. या उपक्रमाचा उद्देश महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाला गती देणे, परकीय गुंतवणूक आकर्षित करणे आणि मजबूत नियोजन व अंमलबजावणीद्वारे रोजगार निर्माण करणे आहे. या कार्याची देखरेख करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने खालील रचना स्थापन केली आहे:

- **विकास केंद्र गव्हर्निंग काऊन्सिल, ज्याचे अध्यक्ष माननीय मुख्यमंत्री आहेत.**
- **विकास केंद्र समन्वय समिती, ज्याचे अध्यक्ष मुख्य सचिव आहेत.**

MMRDA ला अंमलबजावणी प्राधिकारी म्हणून नियुक्त केले गेले आहे आणि याचे दैनंदिन कार्य पूर्ण करण्यासाठी मेट्रोपोलिटन कमिशनर, MMRDA यांच्या नेतृत्वाखाली एक समर्पित प्रकल्प अंमलबजावणी युनिट स्थापन करण्यात आले आहे.

महाराष्ट्र सरकार आणि निती आयोग यांनी 12 सप्टेंबर 2024 रोजी, वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमचे संस्थापक आणि कार्यकारी अध्यक्ष प्रोफेसर क्लॉस श्वाब यांच्या उपस्थितीत मुंबई महानगर क्षेत्र (MMR) ला जागतिक आर्थिक केंद्र म्हणून विकसित करण्याबाबतचा अहवाल लाँच केला.

MMRDA आणि WEF यांच्यात 12 सप्टेंबर 2024 रोजी एक समन्वयात्मक सहकार्यासाठी 'मेमोरँडम ऑफ कॉलॅबोरेशन' (MoC) साइन केला गेला. या सहकार्याचा उद्देश 'सस्टेनेबल अर्बन आणि इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट' क्षेत्रात MMRDA आणि WEF यांच्यातील सहकार्यासाठी एक रचना तयार करणे आहे.

*मुंबई महानगर क्षेत्र शहरी इन्फ्रास्ट्रक्चर सुधारणा कार्यक्रम (MMRUIIP)*

केंद्र सरकार (GoI), राज्य सरकार (GoM), MMRDA आणि KfW यांनी मुंबई महानगर क्षेत्र शहरी इन्फ्रास्ट्रक्चर सुधारणा कार्यक्रम (MMRUIIP) साठी €१०० मिलियन (INR ८५० कोटी) कर्ज करार आणि €२.२ मिलियन (INR १९ कोटी) अनुदान करारावर सह्या केल्या. या कार्यक्रमामध्ये एकात्मिक कचरा व्यवस्थापन आणि वर्तुळाकार अर्थव्यवस्था तसेच शहरी इन्फ्रास्ट्रक्चरचा जलवायु-प्रतिरोधक विकास समाविष्ट आहे.

***विकास केंद्र (ग्रोथ सेंटर) आणि औद्योगिक विकास केंद्र***

१) ***खारबाव ग्रोथ सेंटर*** - भिवंडी तालुक्यातील भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिकेजवळील अतिशय महत्त्वाच्या ठिकाणी प्रस्तावित असून विरार-अलिबाग मल्टी-मॉडल कॉरिडॉर (MMC) आणि मुंबई-अहमदाबाद हाय-स्पीड रेल्वे

(HSR), आणि DFC कॉरिडॉर आदी प्रमुख पायाभूत सुविधा प्रकल्पांसह गुंतवणूक आकर्षित करणारे केंद्र म्हणून उदयास येत आहे.

२) ***पोयनाड ग्रोथ सेंटर*** - अटल बिहारी वाजपेयी (अटल सेतू) (MTHL) आणि विरार-अलिबाग मल्टी मोडल कॉरिडॉर (MMC) आणि दुसरे आंतरराष्ट्रीय विमानतळ यांसारख्या महत्त्वाच्या प्रकल्पांमुळे, अलिबाग तालुक्यातील हे ग्रोथ सेंटर एक महत्त्वपूर्ण उपक्रम म्हणून विकसित होईल.

३) ***कल्याण ग्रोथ सेंटर (KGC)*** - यासाठी MMRDA हे विशेष नियोजन प्राधिकरण आहे. व्यावसायिक आणि निवासी संकुल, शैक्षणिक संस्था आदींसाठीचे केंद्र म्हणून बहरण्याची अपेक्षा आहे.

**औद्योगिक विकास केंद्रे**

१) ***आणगाव IGC,**
२) **सापे IGC,**
३) **अंबा IGC***

यांच्या संबंधित सूक्ष्म-क्षेत्रातील आर्थिक वाढीसाठी, रोजगार आणि कनेक्टिवीटी वाढविण्यासाठी आणि औद्योगिक विकासात विशेषत: उत्पादन क्षेत्रात आणि उच्च दर्जाच्या उद्योगात योगदान देणारी ठरतील. वरील ग्रोथ सेंटरद्वारे मुंबई महानगर प्रदेशांतर्गत सर्वसमावेशक, शाश्वत आणि मजबूत विकासाला चालना देण्याचे उद्दिष्ट आहे. यामुळे आर्थिक विकासाला चालना तर मिळेलच, त्याशिवाय मोठ्या समुदायांच्या जगण्याचा दर्जादेखील उंचावेल. हा उपक्रम बहुकेंद्री विकास, विविध क्षेत्रांत नोकरीच्या संधी, परवडणारी घरे आणि मुबलक मोकळ्या जागा असलेल्या एकात्मिक आरोग्य आणि शैक्षणिक पायाभूत सुविधांच्या भविष्यासाठी आश्वस्त आहे. मुंबई महानगर प्रदेशाने सन २०२८ पर्यंत भारतीय अर्थव्यवस्थेत ०.३५ ट्रिलियन अमेरिकन डॉलर्सचे योगदान देण्याचे प्रस्तावित आहे. त्याकरीता या ग्रोथ सेंटरच्या माध्यमातून अर्थव्यवस्थेत योगदान होईल.

## ४. रिबुटींग मुंबई – रिबुटींग एमएमआर

एमएमआरडीएच्या 'रीबूटिंग मुंबई अँड रीशेपिंग एमएमआर "संकल्पनेत एकात्मिक वाहतूक पायाभूत सुविधा, शाश्वत शहरी विकास आणि लवचिक पायाभूत सुविधांच्या माध्यमातून मुंबई महानगर क्षेत्राचे जागतिक शहरी केंद्रामध्ये रूपांतर करण्याची कल्पना आहे. विरार-अलिबाग मल्टीमॉडल कॉरिडॉर आणि मेट्रो विस्तार यासारख्या प्रकल्पांच्या बरोबरीने, स्मार्ट सिटी उपाय आणि हरित उपक्रमांसह, एमएमआरडीए प्रवासाचा वेळ कमी करण्यास एमएमआरडीए मोठा हातभार लावत आहे आणि आर्थिक विकासाला चालना देत आहे. रमाबाई झोपडपट्टी पुनर्विकासासारख्या मोठ्या प्रमाणावरील झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्पांद्वारे महत्त्वपूर्ण भूमिका बजावून गृहनिर्माण आव्हानांचा सामना करणे हा एक महत्त्वाचे काम एमएमआरडीएमार्फत होत आहे. या उपक्रमांमुळे वंचित समुदायांना केवळ सन्माननीय निवासस्थानच मिळत नाही तर पायाभूत सुविधांच्या विकासासाठी, सर्वसमावेशक विकासाला चालना देण्यासाठी आणि प्रदेशातील सामाजिक-आर्थिक विषमता कमी करण्यासाठी जमीनही उपलब्ध होते. या प्रयत्नांच्या माध्यमातून एमएमआरडीएचे उद्दिष्ट संपूर्ण एमएमआरमध्ये संतुलित, शाश्वत विकास सुनिश्चित करत मुंबईचे आधुनिकीकरण करणे हे आहे.

***प्रस्तावित नव नगर विकास प्राधिकरण क्षेत्र – मुंबई ३.०***

मुंबई बेटाला मुख्य भुमिशी जोडणाऱ्या मुंबई पारबंदर प्रकल्पाच्या प्रभाव क्षेत्राचा नवनगर प्राधिकरण म्हणून सुनियोजित विकास करणे व मुंबई पारबंदर प्रकल्प प्रभाव क्षेत्रातील जमिनींच्या प्रत्याशित मूल्यवृध्दिचा वापर करुन तेथे विकास साधण्यासाठी दि. १५/१०/२०२४ रोजीच्या अधिसुचनेअन्वये अटल सेतू (मुंबई पारबदंर प्रकल्प) प्रभाव क्षेत्रातील रायगड जिल्ह्यातील उरण, पनवेल व पेण तालुक्यातील १२४ गावे नवनगर म्हणून अधिसुचित केली असून सदर 'केएससी नवनगर' करिता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची नवनगर विकास प्राधिकरण म्हणून नियुक्ती केली आहे. केएससी नवनगराचे एकूण क्षेत्रफळ ३२३.४४ चौ.किमी एवढे आहे.

संदर्भित क्षेत्रामधील उद्योगाच्या संधी तसेच अस्तित्वातील दळणवळणाचे जाळे लक्षात घेता सदर क्षेत्रामध्ये औद्योगिक, ट्रान्सपोर्ट हब, लॉजिस्टिक पार्क आणि रहिवास वापरास भरपूर वाव आहे. ज्यामुळे रोजगार निर्मिती होऊन महानगर प्रदेशाच्या अर्थव्यवस्थेत वृद्धी होईल. वरील कामे करण्याच्या दृष्टीकोनातून केएससी नवनगरातील जमिनींचे हवाई सर्वेक्षण, जीआयएस आधारित आधारभूत नकाशा व अस्तित्वातील भूवापर नकाशा तयार करण्यासाठी त्याचप्रमाणे सदर क्षेत्राचा सर्व समावेश बृहत नकाशा आणि नियोजन प्रस्ताव तयार करण्याची प्रक्रीया सुरु झाली आहे.

***माता रमाबाई आंबेडकर नगर आणि कामराज नगर झोपडपट्टी पुनर्वसन योजना***

हजारो झोपडपट्टीधारकांचे पुनर्वसन करणे आणि शाश्वत शहरी विकासाला चालना देणे, हे या महत्त्वकांक्षी प्रकल्पाचे उद्दिष्ट आहे. माता रमाबाई आंबेडकर नगर आणि कामराज नगर येथील योजना एमएमआरडीए आणि एसआरए यांच्या संयुक्त भागीदारी तत्त्वावर राबविण्यात येणार आहे. हा प्रकल्प 48 महिन्यांत राबविण्यात येईल. या प्रकल्पांतर्गत, पात्र झोपडपट्टीधारकांना मोफत सदनिका उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. त्याचप्रमाणे बगीचे, आरोग्य केंद्रे आणि शैक्षणिक सुविधा यांसारख्या मूलभूत पायाभूत सुविधा देखील विकसित करण्यात येणार आहेत. या योजनेमध्ये पूर्व मुक्त मार्गाचे विस्तारीकरणही समाविष्ट आहे. रमाबाई आंबेडकरनगर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील टप्पा क्र. १ करिताझोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकारणाकडून दिनांक ०६/०९/२०२४ रोजी आशय पत्र (Letter of Intent) निर्गमित करण्यात आलेले आहे. तसेच, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकारणाकडून पुनर्वसन ईमारत क्र. १ व २ साठीदिनांक १३/१२/२०२४ रोजीबांधकाम प्रस्तावास/ नकाशे मंजूरी (Intimation of Approval) प्राप्त झालेली आहे. रमाबाई आंबेडकरनगर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील टप्पा क्र. १ च्या बांधकामाकारीता ठेकेदाराच्या नेमणुकीकरीता निविदा लवकरच काढण्यात येणार आहे.

५. **टिकाऊ आणि लवचिक विकास**

एमएमआर प्रदेशातील कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी एमएमआरडीए ऊर्जा-कार्यक्षम मेट्रो प्रणाली, हरित बांधकाम तंत्रज्ञान आणि वर्धित शहरी गतिशीलता उपाय यासारख्या पर्यावरण पूरक तंत्रज्ञानाला शाश्वत आणि लवचिक विकासाला प्राधान्य देत आहे. याव्यतिरिक्त, प्रतिकूल हवामान परिस्थितीतही अखंड संपर्क आणि सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी ते उंचावरील रस्ते, बोगदे आणि किनारपट्टीवरील प्रकल्पांसह हवामान-लवचिक पायाभूत सुविधा तयार करत आहे

**MMRDA आणि सॅमसंग C & T, दक्षिण कोरिया यांच्यात MoU**

MMRDA ने 2024 मध्ये डावोस येथील वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये सॅमसंग C & T, दक्षिण कोरिया सोबत MoU साइन केले. या MoU चा उद्देश MMR मध्ये स्मार्ट सिटीचे विकास करणे आहे, ज्यामध्ये कार्यक्षम, सर्वसमावेशक आणि टिकाऊ शहरी नियोजनाचे वैशिष्ट्य असतील. या सहकार्यात दोन्ही पक्षांचा एकमेकांना सहाय्य करण्याचे, सर्वोत्तम पद्धतींचा आदान-प्रदान करण्याचे आणि स्मार्ट इन्फ्रास्ट्रक्चरच्या क्षेत्रात नवकल्पनांना प्रोत्साहन देण्याचे वचन आहे. MMRDA च्या महत्त्वाकांक्षी दृष्टीकोनाचे realization करत, सॅमसंग कन्स्ट्रक्शन अँड ट्रेड कॉर्पोरेशनच्या मिशनशी जुळवून, स्मार्ट आणि सुरक्षित शहरी जागा निर्माण करण्यासाठी योगदान देणे.

**MMRDA आणि RiverRecycle Oy, फिनलंड यांच्यात MoU**

MMRDA ने 2024 मध्ये डावोस येथील वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये RiverRecycle Oy, फिनलंड सोबत MoU साइन केले. या भागीदारीचा उद्देश पर्यावरणीय आव्हानांचा सामना करणे, प्रदेशाची टिकाव क्षमता वाढवणे आणि हवामान संबंधित धोके कमी करणे आहे.
या MoU मध्ये एकमेकांना सहाय्य करण्याच्या क्षेत्रांची रूपरेषा दिली आहे, ज्यात सर्वोत्तम पद्धतींचा आदान-प्रदान, कचरा व्यवस्थापन, आणि निळ्या व हिरव्या इन्फ्रास्ट्रक्चरचा विकास यांचा समावेश आहे.
ही रणनीतिक सहकार्य MMRDA च्या दृष्टीकोनाशी सुसंगत आहे, जेणेकरून MMR ला एक टिकाऊ महानगर म्हणून रूपांतरित केले जाऊ शकेल, ज्यामुळे 30 मिलियन रहिवाशांसाठी आर्थिक वाढ आणि जीवनमानात सुधारणा होईल.

**MMRDA आणि नेदरलँड्स सरकारच्या अर्थविषयक आणि हवामान धोरण मंत्रालय यांच्यात MoU**

MMRDA ने 2024 मध्ये डावोस येथील वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये नेदरलँड्स सरकारच्या अर्थविषयक आणि हवामान धोरण मंत्रालयासोबत MoU साइन केले.
ही पाच वर्षांची भागीदारी डच तज्ञता आणि निधीच्या सहाय्याने कचरा व्यवस्थापन, हवामान प्रतिरोधक क्षमता निर्माण करणे आणि वर्तुळाकार अर्थव्यवस्था पुढे आणणे यावर लक्ष केंद्रित करेल, ज्यामुळे मुंबईच्या 30 मिलियन रहिवाशांसाठी स्वच्छ, हरित आणि अधिक सक्रिय भवितव्याची दिशा खुली होईल.
चुकीच्या कचरा व्यवस्थापन, हवामान साक्षर इन्फ्रास्ट्रक्चर आणि समृद्ध वर्तुळाकार अर्थव्यवस्थेसाठी सज्ज व्हा.

**MMRDA आणि वर्ल्ड स्मार्ट सिटीज फोरम, युनायटेड किंगडम यांच्यात MoU**

MMRDA ने 2024 मध्ये डावोस येथील वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये वर्ल्ड स्मार्ट सिटीज फोरम, युनायटेड किंगडम सोबत MoU साइन केले.
ही रणनीतिक भागीदारी MMR ला टिकाऊ आणि सर्वसमावेशक शहरी विकासासाठी एक समृद्ध केंद्र बनवण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल ठरते.
WSCF चे स्मार्ट सिटी नियोजनातील तज्ञता आणि अत्याधुनिक तंत्रज्ञान MMR ला एक असा विकास केंद्र बनविण्यात अनमोल ठरेल, जे नवकल्पना, आर्थिक समृद्धी आणि सर्व रहिवाशांसाठी उच्च दर्जाचे जीवनमान प्रोत्साहन देईल.

**मुंबईतील आयकॉनिक प्रकल्प**

*<u>मुंबईतील दादर इंदूमिलमध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्य स्मारकाची उभारणी</u>.*

१२ एकर भूखंड क्षेत्रात पसरलेल्या या प्रकल्पामध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा कांस्य पुतळा हा स्मारकाचा केंद्रबिंदू आहे. स्मारकाची एकूण उंची जमीनीपासून ४५० फूट असून पुतळ्याची उंची ३५० फूट आणि पादपीठ १०० फूट आहे. जमीन, समुद्र आणि आकाशातून सहजरित्या दिसेल अशी पुतळ्याची रचना आहे. पुतळा कांस्य धातूचे आवरण वजन- ८५० टन, स्ट्रक्चरल स्टील वजन- ६००० टन असून वेगवान वाऱ्याच्या विरोध करण्यासाठी पोस्ट-टेन्शन तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. प्रगत स्ट्रक्चरल आरोग्य देखरेख प्रणाली स्थापित केले जात आहे. या प्रकल्पामध्ये विविध सुविधांसह भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक-सांस्कृतिक आणि राजकीय योगदानाबद्दल माहिती, संशोधन, ध्यानवर्ग अशा विविध बाबींचा विचार करण्यात आला असून हा प्रकल्प हरित इमारत प्रमाणपत्रासाठी नियोजीत केला आहे. या स्मारकाची भौतिक प्रगती- ४७% झाली असून प्रकल्पातील विविध इमारतींच्या कामाच्या प्रगतीची सद्यस्थिती स्मारक इमारत (पाद पीठ) –५२.२०%, प्रवेशद्वारइमारत–८८%, व्याख्यान वर्ग–७७.८५%, ग्रंथालय–८०.१५%, प्रेक्षागृह–६२.६०%, बेसमेंट वाहनतळ–९५% अशा प्रकारे झाली आहे. पुतळ्यासाठी १:१ थर्माकोल मॉडेल चे काम सुरू करण्यात आले असून सध्या पुतळ्याच्या पायथ्यापासून २३० फुटांपर्यंत मॉडेलचे काम पूर्ण झाले आहे. पुतळ्याच्या स्कीन तयार करण्यासाठी कांस्य धातूची खरेदी सुरू करण्यात आली आहे. ३१ मेट्रिक टन कांस्य साहित्य खरेदी केले. या प्रकल्पाचा अपेक्षित पूर्णत्वाचा कालावधी डिसेंबर २०२५ असा आहे.

*<u>**महापौर निवासस्थानाच्या परिसरात मा. बाळासाहेब ठाकरे राष्ट्रीय स्मारकाचे बांधकाम करणे.**</u> **(टप्पा-१ व टप्पा-२)***

बाळासाहेब ठाकरे यांचे राष्ट्रीय स्मारक बांधून त्यांची स्मृती जतन करण्यासाठी तसेच जनसामान्यांना त्यांचा जीवनपट उलघडणारी विविध कालखंडातील दृश्यचित्रे दर्शविणारी छायाचित्रे यांचे सादरीकरण करण्यात येणार आहे. यामध्ये टप्पा-१ अंतर्गत प्रवेशव्दार इमारत, प्रशासकीय इमारत, इंटरप्रिटेशन इमारतीचे बांधकाम करणे व महापौर निवासस्थान इमारतीचा सांस्कृतिक ठेवा जतन करुन या इमारतीचे संग्रहालयामध्ये रुपांतरीत करणे तसेच सभोवतालच्या परीसराचे सुशोभिकरण करणे इत्यादी. बाबींचा समावेश असून सद्यस्थितीत टप्पा १ चे काम पूर्ण झाले आहे. टप्पा-२ अंतर्गत हार्डवेअर आणि सहाय्यभूत सेवा, तंत्रज्ञान, लेझरशो, डिजिटल मॅपिंग प्रोजेक्शन, कथा/ गोष्टी सांगणे, चित्रपट, व्हर्चूअल रियालटी, ऑडिओ व्हिजुअल, ऑगमेंटेड रिऍलिटी, होलोग्राफी, टॉल्किंग कॅम्पस, प्रोजेक्शन मॅपिंग, एल ई डी स्क्रीन्स, स्वार्म ड्रोन्स- संपूर्ण मुंबईत ३ किमीच्या परिघातून दिसणारे ड्रोन वापरून आकाशात रूपे दाखवणे आणि तांत्रिक घटक इत्यादी. बाबींचा समावेश आहे. टप्पा २ करीता सल्लागाराची नियुक्ती करण्यात आली असून कंत्राटदाराची नियुक्ती करण्याची प्रक्रीया प्रगतीपथावर आहे.

**एमएमआरडीएचा पहिला पाणीपुरवठा प्रकल्प**

*<u>**४०३ द. ल .लि. प्रतिदिन क्षमतेची सुर्या प्रादेशिक पाणीपुरवठा योजना**</u>*

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा पाणीपुरवठा क्षेत्रात पहिला उपक्रम आहे. या प्रकल्पामुळे वसई-विरार व मिरा-भाईंदर महानगरपालिका आणि त्या परिसरातील ४४ गांवे येथील ३० लाख लोकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागणार असून World Health Organization (WHO) यांच्या निकषानुसार शुध्द पाण्याचा पुरवठा केला जाणार आहे.

सदर प्रकल्पाचा टप्पा १ पूर्ण झाला असून वसई विरार महानगरपालिकेस पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे. पाणीपुरवठा करण्याकरीता गुरुत्वाकर्षण पध्दतीचा वापर करुन विजेच्या खर्चात बचत होणार आहे. प्रकल्पाच्या नियंत्रण आणि देखरेखीसाठी अत्याधुनिक PLC व SCADA तंत्रज्ञानाचा उपयोग करण्यात येत आहे. तसेच टप्पा २ अन्वये मे, २०२५ मध्ये मीरा भाईंदर महानगरपालिकेस पाणी पुरवठा सुरू करण्याचे अपेक्षित आहे.

**श्री देवेंद्र फडणवीस, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री:**

"एमएमआरडीए आणि महाराष्ट्रासाठी २०२४ हे वर्ष परिवर्तनशील ठरले आहे. मेट्रोचा विस्तार आणि पायाभूत सुविधा प्रकल्प जागतिक स्तरावर स्पर्धात्मक शहरी वातावरण निर्माण करणे आमची वचनबद्धता आहे. महाराष्ट्राला १ ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था बनवण्याचे आमचे स्वप्न साकार करण्यासाठी एमएमआरडीएचे उपक्रम महत्त्वपूर्ण आहेत ".

**श्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री आणि एमएमआरडीएचे अध्यक्ष:**

"Re Booting Mumbai and Reshaping MMR हे आमचे स्वप्न प्रत्यक्षात साकारले जात आहे. हे प्रकल्प लाखो लोकांच्या प्रगतीचे, शाश्वततेचे आणि चांगल्या भविष्याचे प्रतिनिधित्व करतात. शहरी विकासाचे मापदंड ठरवणारा महानगर प्रदेश आम्ही तयार करत आहोत ".

**डॉ. संजय मुखर्जी, भाप्रसे, महानगर आयुक्त, एमएमआरडीए:**

मागील वर्षभरात आम्ही मुंबईला पुनरुज्जीवित करणे, एमएमआरचे पुनर्रचना करणे आणि "मिनिटांत मुंबई" या संकल्पनेवर लक्ष केंद्रित केले, ज्यामुळे एक अधिक शाश्वत एमएमआर घडवण्याचा प्रयत्न केला. पहिल्यांदाच एमएमआरसाठी आर्थिक मास्टर प्लॅन्स तयार करताना, आम्ही निती आयोगासोबतच्या नाविन्यपूर्ण भागीदारीद्वारे मुंबईला जागतिक आर्थिक केंद्र म्हणून अधिक बळकट करण्याचा प्रयत्न केला आणि एक ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेकडे वाटचाल केली. जागतिक आर्थिक मंचासोबतची आमची भागीदारी एमएमआरमध्ये गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी आम्हाला केंद्रबिंदू बनवते. प्रत्येक भारतीयासाठी संधींचे शहर म्हणून मुंबई विकसित करण्याच्या आमच्या बांधिलकीतशी आम्ही दृढ आहोत.

शाश्वत शहरी विकासावर लक्ष केंद्रित करण्याच्या दृष्टीकोनातून, एमएमआरडीएची २०२४ मधील कामगिरी मुंबई महानगर क्षेत्राला जागतिक दर्जाचे शहरी केंद्र बनविण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.